३४५

३६१५


महाराष्ट्र शासन

मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य.

कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४

☎-022,27571391. E.Mail:- calfak6@yahoo.com

🖷- 022,27571391.


कार्यालयनी आदेश क्र. १९ दिनांक 17 MAY 2010

विषयः- जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत लेखा परीक्षणाबाबत.

जिल्हा परिषद,पंचायत समिती ग्रामपंचायत, व नगरपालीका लेखा परीक्षण अहवालांचे निरीक्षण केले असताअसे निदर्शनास आले आहे की, उपरोक्त स्थानिक संस्थांचे अधिनियम,नियम तसच शासनाचे वेळोवेळी निर्गमित केलेले अद्यादेश,आदेश,परिपत्रके,सूचना तसेच संबंधीत विभाग प्रमुखांनी संस्थानिहाय ठरविलेले कामकाजाचे स्वरुपांतर्गत पुर्ण अभ्यास करुन त्या अनुषंगाने लेखापरीक्षणाची रचना व आखणी केली जात नाही. परिणामस्वरुप सदर संस्थामधील गंभीर,नियमबाहय बाबींची समिक्षा यथायोग्यरित्या केली जात नसल्याने लेखा परीक्षणाचा कार्यात्मक आलेख उत्तरोत्तर खलावला आहे. स्थानिक निधी लेखा संस्थांचे लेखापरीक्षण करतांना मुख्यःत पाळावयाच्या बाबी खालील प्रमाणे निर्देशित करण्यात येत आहेत.

१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणचे वेळी आवश्यक तेअभिलेख उपलब्ध न झाल्यास मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० मधील नियम क्र.६ अन्वये कार्यवाही करणेत यावी.संबंधितांना अर्धसमास पत्राव्दारे कळविणेत यावे.

२) जिल्हा परिषदेकडून पंचायत समितीकडे खर्चासाठी वर्ग करण्यात येणा-या अनुदानाची तपासणी करताना जिल्हा परिषदेकडे लेखा परीक्षण करतांना त्याप्रमाणे तपासणी करण्यात यावी व वरील अनुदानाची रक्कम पंचायत समिती स्तरावर कशा प्रकारे खर्च करण्यात आलेली आहे याची तपासणी पंचायत समिती स्तरावर लेखापरीक्षणाचे वेळी करण्यात यावी. जेथे अभिलेखे उपलब्ध आहेत त्याच ठिकाणी आक्षेप नोंदविण्यात यावेत.

३) पंचायत समितीकडून ग्रामंपयायतीकडे देण्यात आलेल्या अनुदानाच्या खर्चाची प्रमाणके यांची तपासणी ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण करतांना करण्यात यावी व त्याबाबत काही आक्षेप असतील तर परिच्छेद घेण्यात यावेत.

४) जिल्हा परिषदेकडून शिक्षण विभागांना शाळेसाठी अनुदान अदा करण्यात येते त्यावेळी शिक्षण विभागाने लेखापरीक्षण करताना शिक्षण विभागातर्फे सर्व प्राथमिक शाळांना शैक्षणिक साहित्य,शाळांचे साहित्य,खेळाचे साहित्य विद्यार्थ्यांसाठी गणवेश मोठया प्रमाणावर खरेदी करण्यात येते. अशावेळी शिक्षण विभागाचे लेखापरीक्षण करताना त्या विभागात लेखा आक्षेप नोंदविण्यात यावेत् आवश्यकता असल्यास,अशा शाळेंचे अभिलेखे पंचायत समिती / जिल्हा परिषद (शिक्षण विभाग) स्तरावर अर्धसमास पत्राव्दारे मार्गविण्यात यावेत.

५) संचालनालयाचे परिपत्रक क्र.स्था.१८/ब/सन २००७-०८ /लेपअ/पंरास/१६१४ दिनांक.२०-११-२००८ मधील सूचनांचे अनुषंगाने जिल्हा परिषद,पंयायत समिती. व ग्रामपंचायत व नगरपरिषदांचे लेखा परीक्षण करण्यात यावे.

६) ग्रामपंचायत लेखापरीक्षणाचे वेळी अभिलेखे उपलब्ध न झाल्यास संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र.३८ अन्वये कार्यवाही करणेत यावी.